# ‘सूर्या’सारखे तेजस्वी सूर्यफूल



प्रा. रसिका गवांदे
(मो.नं. ९२८४२३२१९१)
कृषी विद्या विभाग,
क.का. वाघ उद्यानविद्या
महाविद्यालय, नाशिक

## जगातील तेलबिया पिकांपैकी तिसरे महत्त्वाचे पीक



ज्या दिशेने सूर्याची वाटचाल होत असते, त्याच दिशेने सूर्यफुलाची देखील वाढ होते. महाराष्ट्रात प्रामुख्याने जवळ जवळ संपूर्ण मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात सोलापूर, नगर तर विदर्भात बुलढाणा व अमरावती या जिल्ह्यांत सूर्यफूल हे पीक घेतले जाते. सूर्यफूल हे जगातील तेलबिया पिकांपैकी तिसरे महत्त्वाचे पीक आहे. भारतामध्ये कर्नाटक हे राज्य सूर्यफूल उत्पादनात अग्रेसर आहे.

**पि**वळ्या रंगाचे, टपोरे फूल अगदी हुबेहूब सूर्यासारखे तेजस्वी दिसते म्हणून त्याला सूर्यफूल असे म्हणतात. असे मानण्यात येते की सूर्यफुलाचा उदय हा प्रथम अमेरिकेमध्ये (मेक्सिको आणि द. संघराज्यात) झाला. याला मराठीत- सूर्यफूल, हिंदीत- सुरजमुखी तर इंग्रजीमध्ये सनफ्लॉवर असे म्हणतात. सूर्यफुलाचे शास्त्रीय नाव Helianthus annuus L. हा एक ग्रीक शब्द आहे ज्याचा अर्थ Helios (हेलिओस) म्हणजे Sun (सूर्य ) आणि anthos (ॲन्थोस) म्हणजे flower (फूल) म्हणून देखील याला सूर्यफूल असे म्हटले जाते. दुसरे असे की ज्या दिशेने सूर्याची वाटचाल होत असते, त्याच दिशेने सूर्यफुलाची देखील वाढ होते. महाराष्ट्रात प्रामुख्याने जवळ जवळ संपूर्ण मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात सोलापूर, नगर तर विदर्भात बुलढाणा व अमरावती या जिल्ह्यांत सूर्यफूल हे पीक घेतले जाते. सूर्यफूल हे जगातील तेलबिया पिकांपैकी तिसरे महत्त्वाचे पीक आहे. भारतामध्ये कर्नाटक हे राज्य सूर्यफूल उत्पादनात अग्रेसर आहे.

सूर्यफूल हे पीक कोणत्याही हवामानात घेतले जाऊ शकते म्हणून वर्षभर हे पीक महाराष्ट्रात घेतले जाते. परंतु रब्बी हंगामातील सूर्यफुलाचे उत्पादन जास्त मिळते. सूर्यफूल ही compositae (कंपोझिटी) या कुळातील



वनस्पती असून तिची गुणसूत्र संख्या (n)= १७ आहे.

सूर्यफुलाचे भरघोस उत्पादन घेण्यासाठी महत्त्वाचे मुद्दे-

* **जमीन** : पाण्याचा निचरा होणारी मध्यम ते भारी अशी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६.५ ते ८.० असावा, जेणेकरून रोपांची वाढ चांगल्याप्रकारे होईल.

* **पूर्वमशागत** : उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोल नांगरणी करावी. त्यानंतर शेतातील काडी-कचरा वेचून



शेत स्वच्छ करावे. नांगरणीनंतर २-३ आडव्या- उभ्या कुळवाच्या पाळ्या घालाव्यात व जमीन भुसभुशीत करावी. पूर्वमशागतीमध्ये ४ ते ५ गाड्या कुजलेले खत टाकावे. चांगली उगवण क्षमता येण्यासाठी जमिनीमध्ये योग्य प्रमाणात ओलावा असणे गरजेचे आहे; कारण सूर्यफुलाच्या बियांचे वरचे आवरण जाड असून ते पाणी कमी प्रमाणात शोषून घेते.

* **लागवडीसाठी वापरण्यात येणारे वाण** : मॉडर्न, भानू, ज्वालामुखी, फुले भास्कर, फुले रविराज, एल.एस. एफ.एच. १७१, बी.एस. एच. १, एम.एस.एफ. एच. ८, एस, एस-५६, एल. एस. ११, एम.एस.एफ. एच. १७.

* आंतरपीक - सूर्यफूल + तूर ( २:१)

भुईमूग + सूर्यफूल (३:१) या प्रमाणात केल्यास उत्पादनात भर पडेल.

* **बीजप्रक्रिया आणि सुप्तावस्था** : हानिकारक बुरशीपासून बियाण्याला व पिकाला वाचविण्यासाठी बीजप्रक्रिया महत्त्वाची असते. बीजप्रक्रिया ही रासायनिक तसेच जैविक यांपैकी कोणतीही करू शकतो. ३ ग्रॅम कॅप्टन किंवा थायरम प्रतिकिलो किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा या बुरशीनाशकाची पेरणीपूर्व बीजप्रक्रिया करावी. तसेच ॲझोस्पिरिलियम व पी.एस.बी.इ. जिवाणू खताची बीजप्रक्रिया देखील पिकांसाठी फायदेशीर ठरते.

सूर्यफुलाच्या काढणीपूर्वी ४० - ५० दिवस सुप्तावस्था पाहायला मिळते. ही सुप्तावस्था मोडून काढण्यासाठी बियाणे इथ्रेलच्या द्रावणात २५ पीपीएम, ६ तासांसाठी भिजवून घ्यावे.

*** पेरणी** : सूर्यफूल हे वर्षभर घेतले जाणारे पीक आहे. त्यामुळे पेरणी ही खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात केली जाते.

*** खरीप हंगाम** : जुलैचा पहिला पंधरवडा

*** रब्बी हंगाम** : ऑक्टोबरचा दुसरा आठवडा

*** उन्हाळी** : जानेवारीचा शेवटचा आठवडा ते फेब्रुवारीचा पहिला आठवडा.

पेरणी करताना उंच वाढणाऱ्या वाणांमध्ये (संकरित) ८० सें.मी. x ६० सें.मी. अंतर ठेवून करावीत. कमी उंचीच्या वाणांमध्ये (मध्यम व खोल जमिनीत) ४५ x ३० सें.मी. अंतर ठेवावे.

बियाणे पेरताना ३ – ७ सें.मी. खोलीपर्यंत पेरावे.

एकंदरीत ५ – ७.५ किलो बियाणे हे एका हेक्टरसाठी



प्रमाणित केले आहे.

* सुधारित वाण – ८ ते १० किलो प्रतिहेक्टरी

* संकरित वाण – ५ ते ६ किलो प्रतिहेक्टरी

पेरणीनंतर १५ ते १८ दिवसांनी विरळणी करावी.

*** खत व्यवस्थापन** : पिकास प्रतिहेक्टरी ५ टन शेणखत तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार कोरडवाहू पिकास ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद व २५ किलो पालाश पेरणीच्या वेळेस द्यावे. बागायती पिकास ६०:६०:४० किलो नत्र, स्फुरद आणि पालाश प्रतिहेक्टर द्यावे. यांपैकी ३० किलो नत्र व संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळी व ३० किलो नत्र पेरणीनंतर एका महिन्याने द्यावे.

जमिनीत गंधकाची कमतरता असल्यास २० ते २५ किलो प्रतिहेक्टर गंधक पेरणीच्या वेळेस द्यावे, त्यामुळे तेल उत्पादनात वाढ होते.

०.२ % ची बोरॉनची फवारणी फुलोरा अवस्थेत करावी त्यामुळे दाणे भरण्याचे प्रमाण वाढते.

*** तण व्यवस्थापन** : पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी एक खुरपणी व दोन कोळपण्या कराव्यात. कोळपण्या २० व ३५–४० दिवसांनी कराव्यात.

तसेच Alachlor/ Nitrofen किंवा Butachlor या तणनाशकाची फवारणी १–२ किलो प्रतिहेक्टरी याप्रमाणे करावी.

*** पाणी व्यवस्थापन** : सूर्यफूल हे अतिशय संवेदनशील पीक आहे. पिकास संवेदनशील अवस्थेत पाणी देणे अतिशय महत्त्वाचे असते. पुढील संवेदनक्षम अवस्थेत पिकास पाणी देणे गरजेचे असते.

* रोपाची अवस्था

* फुलकळी अवस्था

* फुलोऱ्याची अवस्था

* दाणे भरण्याची अवस्था

या अवस्थांमध्ये पाण्याचा ताण पडू देऊ नये. या अवस्थांमध्ये ताण पडल्यास दाणे पोकळ बनतात व उत्पादनात घट होते.

*** पीकसंरक्षण** : विषाणुजन्य रोग तसेच बुरशीजन्य रोगांपासून पिकाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. विषाणुजन्य रोग हे कीटकांमार्फत पसरतात. त्याच्या नियंत्रणासाठी Imidacloprid २ मि.लि./ १० लिटर पाण्यातून १५ ते २० दिवसांच्या अंतराने तीन वेळा फवारणी करावी.

केसाळ अळीच्या नियंत्रणासाठी त्या अळ्यांचे पुंजके हाताने वेचून रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून नियंत्रण करावे.

*** काढणी व उत्पादन** : फुलाची मागील बाजू पिवळी झाल्यानंतर तसेच पाने व देठ पिवळे पडून गळायला लागल्यावर पिकाची कापणी करावी. नंतर (Head) कणसे ३ ते ४ दिवस उन्हात वाळवून मळणी करावी व साठवण करावी.

उत्पादन – कोरडवाहू – ८ ते १०क्विंटल प्रतिहेक्टरी.

संकरित वाण – १२ ते १५ क्विंटल प्रतिहेक्टरी.

बागायती – १८ ते २० क्विंटल प्रतिहेक्टरी.

*** महत्त्वाची बाब (हस्त परागीकरण)** : पिकाच्या फुलोरा अवस्थेत सकाळी ७ ते ११ या वेळेत हाताला तलम कापड गुंडाळून फुलाच्या तबकावरून हळुवार हात फिरविल्याने कृत्रिम परागीभवन होते. या कृतीमुळे दाणे भरण्याचे प्रमाण वाढते; परिणामी उत्पादनात वाढ होते. हेक्टरी ३–५ मधमाश्यांच्या वसाहती ठेवाव्यात. ■